रयत शिक्षण संस्थेचे,

**सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर**

**२०२०-२०२१**

**ज्युनिअर, बी.कॉम., एम.कॉम व बीबीए.(सीए)**

दि. १६/०७/२०२१

# अत्यंत महत्वाची सूचना

## खालील सूचना अत्यंत महत्वाची असून महाडीबीटी वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी सूचना काळजीपूर्वक वाचून तातडीने कार्यवाही करावी.

सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये महाडीबीटी वेबसाईटवर ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरणाऱ्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, सर्व विद्यार्थ्यांनी महाडीबीटी वेबसाईटवर आपला शिष्यवृत्ती अर्ज लॉगीन करुन शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन मंजुर झाल्याची खात्री करुन घ्यावी. तसेच सदर अर्ज विद्यार्थी लॉगीनला **(Re-Apply)** आलेला नसल्याची खात्रीदेखील करुन घ्यावी.

महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती अर्ज कागदपत्र अपलोड करण्यासाठी किंवा काही दुरुस्ती करण्यासाठी विद्यार्थी लॉगीनला **(Re-Apply)** पाठविलेला असल्यास सदर अर्जात संबंधीत विद्यार्थ्याने तात्काळ दुरुस्ती करुन महाविद्यालयाच्या लॉगीनला ऑनलाईन सबमीट करावा व शिष्यवृत्ती विभागास संपर्क करावा. 9270472479

शासनाकडून एखाद्या विद्यार्थ्याचा अर्ज, विद्यार्थी तिसरे अपत्य किंवा अन्य कारणास्तव रिजेक्ट करण्यात आलेला असल्यास अशा विद्यार्थ्यांनी, विद्यार्थी लॉगीनला **( Re-Apply )** आलेला अर्ज कॉलेज लॉगीनला सबमीट करु नये.

शिष्यवृत्ती अर्ज दुरुस्तीसाठी आल्यावर विद्यार्थ्यांनी सदर अर्जात दुरुस्ती न केल्यामुळे शिष्यवृत्ती अर्ज विद्यार्थी लॉगीनलाच पेंडींग राहिल्यास विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही तसेच अर्ज दुरुस्ती करण्याची शासनाची मुदत संपल्यावर विद्यार्थी सदर अर्जात दुरुस्ती करु शकणार नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. त्यामुळे संबंधीत विद्यार्थ्यास पेईंगप्रमाणे फी भरावी लागेल. यामुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

तसेच ज्या विद्यार्थ्यांचा अर्ज **Desk 1** व **Desk 2** स्टेज वरुन महाविद्यालयाकडून मंजुर होऊन पुढील स्टेजला गेलेला असल्यास विद्यार्थ्यांनी रिडम बटन चेक करावे. रिडम बटन आलेले असल्यास रिडम बटन दाबावे. रिडम संदर्भात सविस्तर सूचना कॉलेजच्या www.cdjcollege.com या वेबसाईटवर टाकलेली आहे.

**मागील वर्षाचा निकाल फेल असल्याने शिष्यवृत्ती अर्ज अद्याप न भरलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासंदर्भात महाविद्यालयात शिष्यवृत्ती विभागात संपर्क करावा. 9270472479**

प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर देखील टाकण्यात आलेली आहे.

**www.cdjcollege.com**

Scanned by CamScanner